MARATHI

# माशांची आमटी



ऋचा झा आणि सुमन्ता डे


एकलव्य

# माशांची आमटी

ऋचा झा आणि सुमन्ता डे
अनुवाद सुजाता देशमुख

एकलव्य






बाबा तापानं फणफणला होता. “आजचा तिसरा दिवस आहे,” असं तो खोकत खोकत म्हणाला आणि तापाच्या गुंगीत परत झोपी गेला.

आपल्याला गुपचूप बाहेर पडण्याची हीच संधी आहे, हे गोपूच्या लक्षात आलं.





आज रविवार! सकाळ झाली होती. रोबी काकूंचं दुकान तेवढं उघडं असणार होतं. त्याच्या घरापासून बरोबर ७४२ पावलांच्या अंतरावर ते होतं. गोपू तिथपर्यंतच एकटा जात असे.

पण आज मात्र त्याच्या डोक्यात काहीतरी वेगळं होतं.




आपल्याला कुणी बघू नये
अशी गोपूची इच्छा होती.

पण कुणीतरी बघितलंच.

‘‘गोपू? अरे थांब, गोपूच आहेस ना?’’

ओह! हरीदा. त्यांच्या रिक्षाची टिंग टिंग करणारी घंटी वाजवायला गोपूला आवडायची. ‘‘ठीक आहे दादा,’’ असं म्हणत, न थांबता कोपऱ्यावरचा पूजेचा मांडव येईपर्यंत गोपू चालत राहिला.





सकाळची पूजेची आरती सुरू होती दुर्गा मातेच्या चेहऱ्यावर हास्य होतं.

बाबा सांगतो, आशीर्वाद देतांना दुर्गामातेचा चेहरा हसतमुख असतो.

पुढे चालता चालता गोपूच्या मनात आलं.

तिथल्या ढोलकीचा आवाज कमी कमी होत गेला
आणि वाहनांच्या भोंग्यांचे आवाज वाढू लागले.


आता फक्त पाच पावलं... गोपूला माहिती होतं.





.......हमरस्ता


पावलांचे ते आवाज, ती धक्काबुक्की, गर्दीचा तो गोंधळ. शहरातल्या आवाजांचं संगीत मला खूप  आवडतं, असं बाबा नेहेमी म्हणायचा.

गोपूचं मात्र तसं नव्हतं. त्याला त्या गोंधळाचा त्रास व्हायचा. पण आज तो तसाच चालत राहिला.






बाजारात प्रवेश करताच, गोपूनं श्वास रोखून धरला. माशांचा, चहाचा आणि
लाल मिरचीचा तिथे भरून राहिलेला वास बाबाला किती आवडायचा.



पण गोपूचं तसं नव्हतं हां!
तिखटामुळे त्याला शिंका
यायच्या. तरीही आज तो
अजिबात थांबला नाही.



आह! आला मासळी बाजार! पोचलो एकदाचा.

मासे विकत घेण्यापूर्वी त्यांचा ताजेपणा बघण्यासाठी बाबाला नाकापाशी नेऊन त्यांचा वास घ्यायला फार आवडायचं. पण गोपूचं मात्र उलट होतं. तसं केलं, तर त्याला मळमळून उलटी करावीशी वाटायची. पण आज मात्र त्यानं बाबासारखा माशांचा वास घेतला.

आणि बाजारातले सगळ्यात ताजे ताजे मासे घेऊन तो बाहेर पडला.





बाजाराच्या बाहेर ट्रॅमचा थांबा
होता. गोपूला लांबून ट्रॅम येतानाचा
आवाज ऐकू आला.






पहिला थांबा. आता दुसरा आला. आणि हा
तिसरा. चौथ्या थांब्यावर गोपू उतरला.



दीदाच्या घरातल्या ओल्या
भिंतींचा स्पर्श गोपूला
आवडायचा.



टक टक!

दीदा, गोपूची आजी दारात उभी.
थक्क होऊन बघत राहिली.

“थांब, मी सांगतो, पण बाबाला
अजिबात सांगू नकोस,” गोपू
अजिजीनं म्हणाला.





अहाऽऽहा! दीदाबरोबर माशांची आमटी करायची म्हणजे मज्जाच!

त्यांनी मोहरी फेटून लेपासारखी पातळ केली, मिरच्या घातल्या आणि तापलेल्या तेलात मासे मस्त तळले जाऊ लागले.

तळणीचा वास येताच त्याला शिंका आल्या, ठसका लागला आणि त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. तरीही त्याला ते सगळं आवडलं.



“मी तुझ्या सोबत येते.” दीदा म्हणाली.

“नको ना येऊस दीदा. बाबाला मला चकित करायचं आहे.” गोपूनं विनवणी केली.

तिला काळजी वाटली. पण आपण नीट जाऊ, असं गोपूनं तिला आश्वासन दिलं.









आता फक्त रस्त्याला
तीनवेळा वळलं आणि
१८४९ पावलं चालली,
की बाबाला त्याची
आवडती माशांची आमटी
मिळणार.

बाबाला किती किती
आनंद होईल.




गोपू घरापाशी पोचला, तशी काहीतरी गडबड असावी असं त्याला जाणवलं.

घराच्या गल्लीत एवढी शांतता आधी कधीच नव्हती.







“गोपू!” बाबा चांगलाच रागीट आवाजात माठ्यानं ओरडला.

संतापलेले, काळजीचे, असे सगळे शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडले. एवढा राग?

बाबाला इतकं रागावता येतं हेच गोपूला माहीत नव्हतं.

आणि बघता बघता बाबा एकदम गप्प झाला.



काही कळायच्या आत बाबानं त्याला घट्ट कवेत घेतलं होतं.


“तुला दिसत नाही, असं कोण म्हणेल गोपू? तू एकट्यानं हे कसं काय केलंस?” बाबा म्हणाला.

“तू तर माझ्याबरोबरच होतास की. तू मला सगळं दाखवलं आहेस.” गोपूनं उत्तर दिलं.





आजवरच्या सगळ्या माशांच्या आमटयांपेक्षा
आजची आमटी सगळ्यात लज्जतदार होती.



गोपूनं बाबाला गर्दीतले वाहनांचे भोंगे, मासे आणि त्यांचा वास, ट्रॅम, सगळं सगळं सांगितलं.

“काय सांगतोस, अशक्य वाटतंय,” बाबा म्हणाला. एव्हाना त्याला बरं वाटायला लागलं होतं.







इतकं, की संध्याकाळी दोघांनी आपले
आपण मासे तळायला घेतले.

माशांची आमटी
MASHANCHI AAMTI

कथा: ऋचा झा
रेखाचित्र: सुमन्ता डे
मराठी लेआउट: पूजा के मेनन
इंग्रजी से अनुवाद: सुजाता देशमुख
सम्पादन: मिलिंद परांजपे

मराठी अनुवाद: एकलव्य फाउंडेशन, मे 2023

हि पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपल्ब्ध आहे.
वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

रेखाचित्र © सुमन्ता डे, मे 2023

Published as *Machher Jhol* in the by Pickle Yolk Books,, and *माछेर झोल*, by Eklavya Foundation.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्टच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित

प्रकाशन: मे 2023 (2000 प्रती)
कागद: 100 gsm मैपलिथो पेपर आणि 220 gsm एफबीबी (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-94552-81-4
मूल्य: ₹ 115.00

प्रकाशक: एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेड़ी, भोपाल - 462 026 (मप्र)
फोन: +91 755 297 7770-71-72
वेबसाइट: www..eklavya.in; ईमेल: books@eklavya.in

मुद्रक: आदर्श प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 255 5442



**ऋचा झा :** या एक उत्साही लेखक आणि प्रकाशक आहेत. ‘पिकल योक बुक्स’ च्या **(Pickle Yolk Books)** चित्रकथांसाठी त्या स्वतंत्रपणे काम करतात. त्यांच्या आतापर्यंत बारा चित्रकथा प्रकाशित झाल्या आहेत. युवा वाचकांच्या साहित्य संग्रहाचं संपादनही त्यांनी केलं आहे. प्रतिष्ठेच्या विविध पुरस्कारांमध्ये, ‘क्रॉसवर्ड अवॉर्ड’, ‘पब्लिशिंग नेक्स्ट इंडस्ट्री अवॉर्ड’ आणि ‘फिक्की पब्लिशिंग अवॉर्ड’ यांसाठी त्यांची अनेक पुस्तकं निवडली गेली आहेत.

पुस्तक वाचनाबरोबरच नवनव्या स्थळांना भेटी द्यायला त्यांना आवडतं.

**सुमन्ता डे :** हे एक कलाकार आणि रेखाचित्रकार होते. बंगळुरू इथल्या एका आंतरराष्ट्रीय बोर्डाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळेत **(International Baccalaureate)** ‘आयजिसीएसई’ च्या विद्यार्थ्यांना ते प्रशिक्षण देत असत. त्यांच्या अनेक कलाकृतींचा आतापर्यंत भारतातल्या आणि परदेशातल्या प्रदर्शनांमध्ये समावेश होता. प्रतिष्ठेचे अनेक पुरस्कार आणि राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय पाठ्यवृत्ती त्यांना मिळाल्या होत्या. भित्तिचित्रं (म्युरल्स) तयार करणं ही त्यांची खासियत होती आणि त्यांच्या आनंदाचाही तो भाग होता. कोलकात्यातल्या त्यांच्या घरात अशी भित्तिचित्रं आजही पाहायला मिळतात.

२०२१ साली त्यांचं निधन झालं.

बाबाचं कपाळ तापानं फणफणलं होतं.

“आज तिसरा दिवस आहे,” असं खोकत खोकत तो म्हणाला आणि तापाच्या गुंगीत झोपी गेला.

आपल्याला गुपचूप बाहेर पडण्याची हीच संधी आहे, हे गोपूच्या लक्षात आलं.

कोलकात्याच्या गर्दीच्या रस्त्यांवरून जातांना गोपूला पावलांचे आवाज ऐकू येतात, धक्काबुक्की होते आणि गर्दीचा गोंधळ जाणवतो.

गोपू कुठे जातोय? तो एकटाच का जातोय?



एकलव्य

Pickle Yolk Books

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

मूल्य: ₹ 115.00

9 789394 552814